SJIF 2015 : 3.801
ISSN: 2348-3083
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR
HUMANITY SCIENCE & ENGLISH LANGUAGE

# भारतीय पुरातत्वशास्त्राचे जनक पुरातत्वज्ञ सर जॉन मार्शल

**प्रा. शिंदे नारायण अंबू**

*कर्मवीर काकासाहेब वाघ कला, विज्ञान व वाणिज्य महाविदयालय, पिंपळगांव बसवंत, ता. निफाड, जि. नाशिक.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

इ.स. १९०२ ते १९३१ पर्यंत भारतीय पुरातत्व सर्व्हेक्षण खात्याच्या महानिदेशक पदाची धुरा ज्यांनी समर्थपणे सांभाळली व उत्खननातून मिळालेल्या आणि अनेक प्राचीन अवशेषांची नोंद केली असे असमान्य प्रतिभेचे पुरातत्वज्ञ सर जॉन मार्शल यांचा जन्म १९ मार्च इ.स. १८७६ रोजी इंग्लंडमध्ये झाला. ते वयाच्या २५ व्या वर्षी भारतात आले. तत्पुर्वी केंब्रिज विदयापिठातील पुरातत्व विदयेची पदवी प्रथम श्रेणीत ते उत्तीर्ण झालेले होते. शालेय जीवनापासूनच त्यांचा कल ग्रीक आणि रोमन संस्कृतीच्या अभ्यासाकडे होता. त्यासाठी ते ग्रीसमध्ये गेले होते. तेथील उत्खननात त्यांनी भाग घेतला होता. तेथील अनुभवाचा उपयोग त्यांना भारतात पुरातत्व खात्याचा प्रमुख म्हणून काम करीत असतांना फार मोठया प्रमाणावर झाला. शास्त्रीय पध्दतीने उत्खनने करण्यात व सापडलेल्या वस्तूंची व्यवस्था लावण्यात त्यांना खूप मदत झाली.

**सिंधू संस्कृतीचा शोध व अभ्यास :**

भारतात एक प्राचीन नागरी संस्कृती नांदत होती. व ती अनेक अंगांनी वैशिष्टयपुर्ण होती, ऐश्वर्यसंपन्न होती. याची जाणीव जगाला करून देणारे व या संस्कृतीचा सखोल अभ्यास करणारे जॉन मार्शल यांचे कार्य भारतीय पुरातत्व शास्त्राच्या दृष्टीने दिपस्तंभासारखेच मानावे लागेल. कारण त्यांच्या संशोधनामुळे तत्कालीन अविभाजित भारतातील हडप्पा आणि मोहेंजोदाडो या दोन्हीही ठिकाणी एकाच नागरी संस्कृतीचे अवशेष सापडल्याची बातमी २० सप्टेंबर १९२४ रोजी लंडनच्या प्रतिष्ठित 'इ इलस्ट्रेटेड न्यूज' च्या अंकात प्रसिध्द झाल्यामुळे जगभरातील पुरातत्वाच्या क्षेत्रात खळबळ उडाली आणि खऱ्या अर्थाने ही प्राचीन महत्तम संस्कृती जगाच्या नकाशावर आली. अनेक अभ्यासक या संस्कृतीच्या अभ्यासासाठी पुढे सरसावले. व अभ्यासाअंती त्यांनी निष्कर्ष काढले की, प्राचीन प्रगत संस्कृत्यांसारखीच किंबहुणा त्याहून

अधिक पुढारलेली नागर संस्कृती भारतात सिंधू नदी व तीच्या उपनदयांच्या काठी नांदत होती. म्हणून या संस्कृतीला सिंधू संस्कृती म्हणून ओळखले जाऊ लागले.

सिंधू संस्कृतीतील हडप्पा व मोहेंजोदाडो या ठिकाणी उत्खननात महत्वाचे योगदान देवून संशोधन करून भारताला कमीत कमी ५००० वर्षांचा इतिहास आहे असे वस्तूमानाआधारे स्पष्ट करणारे पुरातत्वज्ञ मार्शल यांनी १९०६ सालीच भारतीय पुरातत्व खाते तत्कालीन ब्रिटीश शासनाकडून कायम करून घेतले. पुरातत्व खात्याच्या प्रशासनाची व्यवस्था आणि अवशेष जतनाची मुलभूत तत्वे विशेद करून त्यानुसार कार्यवाही केली. त्यांच्या रूपाने खऱ्या अर्थाने भारतीय पुरातत्व खात्याला एक सक्षम अभ्यासू शास्त्र जाणणारा मार्गदर्शक मिळाला. प्रारंभी ५ वर्षांसाठी आलेल्या या २५ वर्षांच्या तरूणाने आपल्या कर्तबगारीने ५००० वर्षांच्या इतिहासाची जगाला ओळख करून देत तब्बल २५ वर्षे हे पद सांभाळले, भूषविले व एक वेगळया उंचीवर नेऊन ठेवले. सिंधू संस्कृतिचा शोध याबददल त्यांनी केलेल्या विवरणामुळे प्राचीन भारतीय इतिहासाच्या अभ्यासकांना एक नवीन दालन उघडले गेले.

हाती घेतलेले काम करण्याची त्यांची गती व वृत्ती दोन्हीही कौतुकास्पद होती. त्यामुळे पुरातत्वाच्या क्षेत्रात कल्पक आणि अभिनव योगदान देणाऱ्यांपैकी एक आघाडीचे शास्त्रज्ञ, तत्वज्ञ व संशोधक म्हणून त्यांनी भारतीय पुरातत्व शास्त्राला एक शास्त्रीय बैठक प्राप्त करून दिली. त्यांच्या या अतुलनीय कार्यामुळे त्यांना अनेक मान सन्मान मिळणे सहाजिकच होते.

**पुराण वस्तूंवर महत्वाचे ग्रंथलेखन :**

मार्शल यांनी उत्खननाचे वृत्तांत प्रसिध्द करत असतांना संशोधनाच्या महत्वाच्या अंगांकडेही लक्ष पुरविले व भारतीय पुराण वस्तूंवर अत्यंत महत्वाचे ग्रंथही लिहिले. त्यांच्या ग्रंथांपैकी 'द मॉन्यूमेंटस ऑफ सांची (तीन खंड १९३९), मोहेंजोदरो ॲन्ड द इंडस सिव्हिलायजेशन (तीन खंड १९३१) आणि तक्षशिला (१९५१)' हे विशेष प्रसिध्द आहेत.

**प्राच्या विदयापारंगत विदवान :**

मार्शल यांचे भारतीय पुरातत्व शास्त्रासंबंधीचे योगदान चौफेर होते. जतन करण्यात आलेल्या वास्तू, जिर्णोध्दार केलेल्या वास्तू म्हणजे मंदिरे, मशिदी, संशोधन करून शोध घेतलेल्या वास्तू व वस्तू, शिलालेख, नाणी यांचा संशोधनात्मक अभ्यास करून ग्रंथलेखन करणे व प्रेक्षणिय आणि संग्राहय अशा वस्तू, नाणी, अभिलेख इत्यादीसाठी वस्तूसंग्रहालये उभारण्यासाठी मार्शल यांनी प्रोत्साहन दिले. एवढेच नव्हे तर वस्तूसंग्रहालये, मंदिरे, स्मारके, इमारती इत्यादींचा परिसर प्रसन्न असावा म्हणून बागांची निर्मिती केली पाहिजे यासाठीही त्यांनी दक्षता घेतली.

**समारोप :**

सर जॉन मार्शल यांनी भारताच्या प्राचीन इतिहास आणि संस्कृतीवर त्या काळात जो प्रकाश टाकला, संशोधन केले, प्रदिर्घ कार्य पूर्णत्वास नेले ते पाहता त्यांची किर्ती पुरातत्व शास्त्राच्या संदर्भात त्यांना अजरामर करणारी आहे. त्यांनी मांडलेले निष्कर्ष त्यांच्यातील प्रतिभासंपन्न पुरातत्वज्ञाची ओळख जगाला करून देतात. भारतीय सेवेतून सेवानिवृत्त झाल्यानंतर इंग्लंडमध्ये गेलेल्या या संशोधकाला ब्रिटीश सरकारने सर पदवी देऊन सन्मानित केले व वयाच्या ७२ व्या वर्षी इ.स. १७ ऑगस्ट १९५८ रोजी इंग्लंडमध्येच त्यांचे निधन झाले.

## संदर्भ पुस्तके

*जॉन मार्शल, लेखक : जयंत खेर, इंकिंग इनोव्हेशन प्रकाशन.*
*पुरातत्व शास्त्राचा इतिहास, लेखक : दिलीप के. चक्रभारती, ऑक्सफर्ड युनिर्व्हसिटी प्लेस*
*प्राचीन भारत, मुळ लेखक : प्रा. आर.एस. शर्मा, मराठी अनुवाद : वासंती फडके, के. सागर पब्लिकेशन्स*
*प्राचीन भारताचा इतिहास, लेखक : डॉ. अनिल कटारे, प्रशांत पब्लिकेशन्स*
*'भारतीय पुरातत्वाचा उदगाता' महाराष्ट्र टाईम्स, २६ एप्रिल २०१५*
*'हडप्पा नव्हे, राखीगढीट, लोकमत, २६ सप्टेंबर २०१६*
***http://mr.wikipedia.org/s/d1i***